ॐ

# अध्याय दुसरा

१ संजय सांगे धृतराष्ट्रातें पार्थ तसा उद्वेगें
मान खालती घालुनी रथीं बसला होता मागें १
भरुनी आले नयन त्यांतुनी घळघळ वाहे नीर
कारुण्यें अति दीन जाहला म्हणुनी सुटला धीर २

२ संबोधुनियां तदा तयातें मधु-सूदन यदु-राज
म्हणे, ‘अर्जुना, परंतपा, तुज काय जाहलें आज ? ३
युद्धाचा हा समय पहा तूं विसरलासि साचार
कुठुनी सुचला तुजला असला घातक हा अविचार ! ४
जो आजवरी न च आदरिला जगीं कधीं आर्यांनीं
स्वर्ग-सुखातें तेविं यशातें निश्चित आणी हानी. ५

३ नको होउं तूं निवीर्य असा शोभत हें तुज नाहीं
हृदयाची ही तुच्छ ढिलाई सोड ! ऊठ लवलाहीं !!’ ६

४ वदे परं-तप 'तूं चि सांग हे मधु-सूदन, कंसारे,
युद्धास्तव ना उभे ठाकले द्रोण-भीष्म सामोरे ७
गुरुचें नातें सदा आमुतें पूजनीय हे जाण
ह्या संग्रामीं कसा बरें मी ह्यांवरि सोडूं बाण ? ८

५ नको मारणें थोर गुरु-जनां नको चि नरकीं जाणे
बरें त्याहुनी उदर-भरण हें भिक्षान्नावर करणें ९
वधुनि गुरु-जनां रणीं तयांच्या भिजलेले रक्तानें
नको नको ते भोग भोगणें जगांत लाजिरवाणें ! १०

६ न कळे आम्ही जिंकावें कीं तयांसि जिंकूं द्यावें
परिणामीं हित कशांत अमुचें कसें मला समजावें ११
वधुनि जयांतें जगण्याची हि इच्छा न धरूं चित्तीं
धृतराष्ट्राचे पुत्र पुढें ते उभे ठाकले असती १२

७ दैन्य-दोष हा झांकुनि टाकी स्वाभाविक मद्वृत्ति
म्हणुनि अतां निज-कर्तव्याचा स्फुरे न निर्णय चित्तीं १३
विनंति ह्यास्तव सांग सुनिश्चित जें श्रेयस्कर आज
शिष्य तुझा मी असें शरण तुज उपदेशामृत पाज १४

८ जरी निष्कंटक समृद्ध ऐसें राज्य भू-तलावरतीं
प्राप्त जाहलें अथवा आलें तसें इंद्र-पद हातीं १५
तरी न च दिसे येथें मातें जगत्पते अवधारीं
त्वरित जें महा-मोह-जन्य हा दाहक शोक निवारी.' १६

९ संजय सांगे असें बोलुनी पार्थ श्रीकृष्णातें
म्हणे, ‘केशवा, झुंजणार मी नाहीं नाहीं येथें !’ १७

आणि मागुतीं स्तब्ध राहिला तो दोन्हीं सैन्यांत
कुरु-कुलाधिपा, ऐक जाहला पुढें काय वृत्तांत. १८

१० त्या रणांगणीं असा पाहुनी सखेद बसला पार्थ
वदे तदा जणुं हांसत हांसत हृषीकेश भगवंत १९

११ ‘हे पंडु-सुता, जरी जाणता म्हणविसि तूं अपणातें
तोडिसी न कां अजुनि गुंतलें अज्ञानाशीं नातें २०

शिकवूं जातां तूं चि सांगसी पांडित्याच्या गोष्टी
आणि राहसी सचिंत सभ्रम असा होउनी कष्टी २१

सांग अर्जुना, जन्म-मृत्यु हे तूं चि निर्मिले काई ?
जणूं त्रि-भुवना दुजा तुजविना कुणी च आश्रय नाहीं ! २२

भ्रमुनि मीपणें येथ कुरु-जनां घात न धरिसी चित्तीं
तरी सकल हे तूं चि विचारीं काय चिरंतन होती ? २३

होय जाय ही भ्रांति मानुनी ज्ञानी न करी शोक
आणि रणांगणिं पहा तुझा हा असला हीन विवेक ! २४

१२ सकल नृ-पति हे मी तूं पूर्वीं नव्हतों ऐसें नाहीं
तेविं ह्यापुढें नसूं अशा हि पडूं नको संदेहीं २५

उपजे नाशे असा दिसे हा मायेस्तव आभास
नसे तत्त्वतां जन्म-मरण हें अविनाशी आत्म्यास २६

जसा सागरीं संघ उठावा वायुस्तव लाटांचा
तसा स्व-रूपीं जन्म पांडवा मायेस्तव भूतांचा २७

वायूचें तें स्फुरण थांबतां सपाट झालें उदक
तरी निमालें काय ? करीं हा सारासार विवेक. २८

१३ जसें बालपण यौवन किंवा वृद्धावस्था देहीं
जीवासि तसें देहान्तर हि ज्ञाता भ्रांत न होई २९

मनुज सहज निज-रूप विसरुनी होत इंद्रियाधीन
विषय-सेवनें तदा तया तीं कवळुनि करिती दीन ३०

१४ विषय अशाश्वत जाण तयांतें उद्भव आणि विनाश
शीतोष्णें सुख-दुःख देउनी आकळिती मनुजास ३१

म्हणुनि इंद्रियाधीन कधीं ह्या न च धनंजया, व्हावें
अलिप्त राहुनि शांतपणें त्वां सकल हि विषय सहावे ३२

१५ हर्ष-विषादें व्यथित न करिती पार्था, विषय जयातें
सुख-दुःखीं सम धीर पुरुष तो पावे मोक्ष-पदातें ३३

१६ जें नाहीं तें असेल कुठुनी अभाव अस्तित्वाचा ?
तत्त्वज्ञानीं निर्णय केला ह्या दोहींचा साचा ३४

जसें वेगळें करी मिसळलें राजहंस पय-पाणी
तद्वत् विश्वीं गुप्त सार तें शोधी तत्त्व-ज्ञानी ३५

सुवर्ण आणिक हीण निवडिती बुद्धिमंत तावून
उपाधींतुनी तेविं काढिती संत सार शोधून ३६

कीं पाखडुनी भूस टाकुनी केवळ दाणा घेती
तैसे ज्ञानी माया त्यजुनी ब्रह्म-पदीं स्थिर होती ३७

१७ तें अविनाशी जाण जें असे अखिल जगा व्यापोनी
विनाश अव्यय तत्त्वाचा त्या करूं शकेना कोणी ३८

१८ अविनाशी अ-प्रमेय अ-व्यय जीवात्म्याचे देह
नाशिवंत ते, न च जीवात्मा ह्यांत नसे संदेह ३९

नाम-रूप हें मिथ्या पाहें न करीं शोक सु-धीरा,
उभा ठाक निःशंक संगरीं करीं शस्त्र घे वीरा ! ४०

१९ वधितां समजे ह्यातें किंवा वध्य गणी जो कोणी
वध्य न वधितां हा ह्यास्तव ते उभयतां हि अज्ञानी ४१

२० होउनि गेला होणार पुढें असा न ह्यातें जाण
जन्म न पावे न निमे अज हा शाश्वत नित्य पुराण ४२

जाण विनाशी देह जाय परि भंग नसे आत्म्यातें
शस्त्रें छाया तोडिली तरी काय रुते अंगातें ? ४३

२१ अ-ज अ-क्षर अ-व्यय अविनाशी आत्म्यातें जो जाणे
मरणें किंवा कुणा मारणें कसें तिथें संभवणें ! ४४

२२ मनुष्य घेतो जुनीं टाकुनी नवीन वस्त्रें दुसरीं
तशीं शरीरान्तरें स्वीकरी जीवात्मा संसारीं ४५

२३ चिरिती शस्त्रें न च आत्म्यातें जाळूं न शके अग्नि
तेविं न सुकवी पवन हि ह्यातें भिजवी न च तें पाणी ४६

२४ न तुटे न जळे न भिजे न सुके असे सर्व-गत नित्य
तेविं स्थिर हा अचल सनातन हा अव्यक्त अचिंत्य ४७

२५ हा पावे ना विकार नाना म्हणुनि बोलती एक
आत्म-रूप हें असें जाणुनी नसे उचित तुज शोक ४८

२६ किंवा आत्मा नित्य जन्मुनी निमे मानिसी ऐसें
तरी हि विजया, खेद कराया कारण कांहीं न दिसे ४९

२७ दिवस उगवला जसा मावळे अस्तापाठीं उदय
रितें चि भरतें भरलें सरतें हा सृष्टीचा न्याय ! ५०

उपजे तें तें विनाश पावे नाश पावलें निपजे
अटळ गोष्ट ही म्हणुनि अर्जुना, तुज हा शोक न साजे ५१

२८ आणि भारता, कथितों आतां तत्त्व जाणुनी घेईं
आकळे तरी तुज शोकाचें उरे न कारण कांहीं ५२

प्राणिमात्र तें व्यक्त होतसे अव्यक्तापासून
पुनरपि अंतीं त्या अव्यक्तीं होतें सहज विलीन ५३

ह्यापरि साचा भूत-सृष्टिचा आदि अंत अव्यक्त
परि स्व-रूपीं मायेस्तव हा आकार असे दिसत ५४

जसे सागरीं वाऱ्यासंगे बहु तरंग खेळावे
तसे स्व-रूपीं मायेस्तव हे भूतांचे मेळावे ५५

जशी सुवर्णी विविध भूषणें पाहे अपुली दृष्टी
तशी स्व-रूपीं मायेस्तव कीं ही भूतांची सृष्टी ५६

कीं मातींतुनि कुंभकार तो निर्मी विविध घटांतें
तशीं स्व-रूपीं मायेस्तव तीं होती नाना भूतें. ५७

२९ स्व-रूप सहजें ब्रह्म-रूप तें असे थोर आश्चर्य
असें पाहती निश्चल होती निजान्तरीं मुनिवर्य ५८

अशा चि रीती कुणी वर्णिती कुणी ऐकती येथ
परंतु ह्यातें ऐकुनी हि ते पुनरपि होती स्व-स्थ ! ५९

दर्शन-वचन-श्रवण साधनें सर्व हि अपुरीं जाण
आत्मानुभवीं नुरे तत्त्वतां ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान !! ६०

३० अवध्य आत्मा सर्वां देहीं पार्था, नित्य अभेद
म्हणुनि सर्वथा रणीं झुंजतां आतां न करीं खेद ६१

३१ आणि अर्जुना, क्षत्रिय ना तूं ? घे स्व-धर्म लक्षांत
रणांगणीं तुज धीर सोडणें नसे उचित निभ्रांत ६२

धर्म-युद्ध हें स्वभाव कर्म क्षत्रियांसि जें विहित
तें चि हित तयां दुजें न विजया, जगांत पर-लोकांत ६३

३२ जें यदृच्छया प्राप्त जाहलें उघडें स्वर्ग-द्वार
लाभ सुदैवें क्षत्रियांसि हा इथें नको माघार ६४

३३ अतां पांडवां, धर्म-युद्ध हें जरी न तूं लढशील
स्वधर्मासवें कीर्ति सांडुनी तूं पापी ठरशील ६५

३४ अखिल जग तुझ्या दुष्कीर्तीचें अक्षय गाइल गान
संभावित जो अपकीर्ति तया मरणाहून हि मरण ! ६६

३५ ह्या समयीं जरि कारुण्य-भरें शस्त्र ठेविसी खालीं
वैरी तुजवरि दुर्वचनांची वाहतील लाखोली ६७
विपर्यास तव कृतिचा करुनी तुज न पळूं देतील
कठोर कौरव रणीं वेढुनी धारेवरि धरितील ६८
यदाकदाचित् संकटांतुनी निसटलासि तूं नीट
लाजिरवाणें जिणें तरी तें मरणाहुनि वाईट ! ६९
चित्तिं विचारीं रथी अतिरथी म्हणतील तुला काय
मरण-भय मनीं त्वां रणांतुनी म्हणुनि काढिला पाय ७०
सादर जे तुज पूर्वी सहजें मानित होते मान्य
ते चि मागुतीं तुज परं-तपा, लेखितील सामान्य ७१
३६ साधुनि संधी निंदितील तव सामर्थ्यातें वैरी
बोल बोलुनी भलते सलते सभ्य न जे उच्चारी ७२
निंदा-वच तें दुःसह होतां हातीं शस्त्र धरावें
त्याहुनि सांगे न च अतांच कां शूर-पणें झुंजावें ? ७३
३७ लढतां लढतां वैरी कौरव मारितील तुज ठार
तरि स्वभावें जाण उघडलें स्वर्ग-सुखाचें द्वार ७४
विजयीं होतां सकळ मही-तळ तुझें चि आहे विजया,
म्हणुनि निश्चयें धनंजया, तूं होईं सिद्ध लढाया ७५
३८ सुखीं हर्षुनी जाउं नको तूं दुःखीं खेद न मान
करीं धनु धरीं गणुनि जयाजय लाभालाभ समान ७६

रणीं झुंजतां जय-संपादन अथवा येइल मरण
परि तें पार्था पुढील आतां कांहीं न मनीं आण ७७
स्व-कर्म करितां जें स्वभावतां पावे तें तें सोस
तुज ह्या रीति झुंज झुंजतां मुळीं न लागे दोष. ७८
३९ देह विनाशी अज अविनाशी आत्मा नित्य अनंत
तुज सांगितला असा हा भला ज्ञान-योग-सिद्धान्त ७९
ऐक भारता, कथितों आतां बुद्धि-योग विवरून
तोडिशील तूं कर्म-बंधनें जेणें कर्म करून ८०
कर्म करावें परी न व्हावें कर्म-फलीं आसक्त
उपाधींत राहुनी असावें निरहंकार अलिप्त ८१
४० प्रत्यवाय नच इथें जाय नच अल्पाचरण हि वायां
शक्त असे हा संसार-भयापासुनि मुक्त कराया ८२
४१ एक चि ती सद्बुद्धि दाखवी पथ जी ब्रह्म-पदाचा
दुर्मति धरिती विविध वासना मोह तयां विषयांचा ८३
४२ असती कर्मठ वेदवादरत मीमांसक ते पाहीं
ध्येय परम तें स्वर्ग-सुख तयां पुरुषार्थ दुजा नाहीं ८४
४३ आणि बोलती कीं विधिपूर्वक मनुजें यज्ञ करावे
जन्मजन्मुनी स्वर्लोकींचे विविध भोग इच्छावे ८५
मंद-मती ते सकामचित्तें भुलले स्वर्ग सुखातें
आणिक भोक्ता यज्ञ-पुरुष जो पहा विसरलें त्यातें ८६

वेद-विहित सत्क्रिया यथाविधि आचरिती परिपूर्ण
धरुनि परि मनीं हेतु निदानीं व्यर्थ दवडिती पुण्य ८७

४४ स्वर्ग-फल-प्रतिपादक वचनीं चित्त जयांचें भुललें
आत्म-सुख तयां विषयासक्तां म्हणुनि पारखें झालें. ८८

४५ सत्त्व-रज-तम त्रि-गुणात्मक ते वेद अर्जुना, जाणें
त्रि-गुणातीत ब्रह्म-पदाचें न तया दर्शन होणें -- ८९

म्हणुनि वर्णिती 'नेति' 'नेति' ते नित्य ब्रह्म-पदातें
त्रि-गुण सांडुनि तद्ब्रह्म पदीं अभेद जोडीं नातें ९०

पुण्य-पाप सुख-दुःख तेविं तीं शीतोष्णादि द्वन्द्वें
सोडुनि सारीं तूं अविकारी सद्रूपीं चि रहावें ९१

तेविं पांडवा, योग-क्षेमीं तूं निश्चिंत असावें
आणि सर्वथा निज-स्वरूपीं अखंड रंगुनि जावें ! ९२

४६ तुडुंबलें जग जलें जेतुलें उरे प्रयोजन कूपीं
तद्वत् वेदीं उरे तया जो रमे नित्य निज-रूपीं ९३

४७ न च कर्म फलीं तुझा स्व-कर्मीं असे मात्र अधिकार
फलीं न ठेवीं हेतु, न च करीं अकर्म-अंगीकार ९४

४८ सफल जाहलें जरी घेतलें कर्म सुदैवें हातीं
येउनि किंवा प्रत्यवाय तें पावलें न परिपूर्ति ९५

तरी पांडवा, मुळीं तोष वा विषाद न मनीं आण
कर्म ब्रह्मीं समर्पितां तें पूर्ण जाहलें जाण ! ९६

यशायशीं सम-भाव ठेवणें हें योगाचें सार
साधुनी फलीं आस न धरितां करीं कर्म साचार ९७

४९ कर्म-भाग अति निष्कृष्ट येथें समत्व-बुद्धि श्रेष्ठ
बुद्धि-योग हा जाण पांडवा, कर्माहूनि वरिष्ठ ९८

ह्यास्तव कर्में आचरितां घे बुद्धि-योग आधार
आस ठेविती कर्म-फलीं ते दीन हीन लाचार ! ९९

५० बुद्धि-युक्त ह्या जगीं सांडितों पाप-पुण्य-संबंध
म्हणुनि तूं फलासक्त न होता बुद्धि-योग हा साध १००

कर्में करुनी बंध तयांचे न पावणें कीं जाण
कर्म-कुशलता हीच तत्त्वतां योग-साधनीं खूण १०१

५१ आणि जाणते बुद्धि-युक्त ते सांडुनि कर्म-फलातें
जन्म-मृत्युचे बंध तोडुनी जाती ब्रह्म-पदातें १०२

५२ तव बुद्धि जधीं मोह-मलाचें दूर करिल आवरण
नको होइल श्रुति-श्रवण तें श्रुताचें हि संस्मरण ! १०३

हवें कशाला श्रौत-कर्म-फल तुजसी श्रवण कराया
नाना-विध ते यज्ञ-याग-विधि किंवा जाणुनि घ्याया १०४

श्रुति-वचनें तीं पहा सुचविती स्वर्ग-सुखें पर-लोकीं
परंतु शाश्वत असे एक तें आत्म-सुख चि अवलोकीं १०५

५३ श्रुति-वाक्य-फलीं बुद्धि भोंवली स्थिर निश्चल राहील
आत्म-सुखिं, तदा स्थित-प्रज्ञ तूं योग-युक्त होशील. १०६

५४ तैं पार्थ वदे, 'हे कृपा-निधे, श्रीवैकुंठाधिपते,
ज्ञान-कथा ह्या श्रवण कराया उत्कंठित मन होतें १०७

कुणा म्हणावें स्थित-प्रज्ञ तें सांगावें विवरून
बोले चाले बसे कसा तो काय तयाची खूण ? १०८

अखंड भोगी सहज-समाधि कसा प्रपंचीं राहे
लक्षण बरवें सर्व हि देवें बोलावें लवलाहें.' १०९

५५ भक्तविनवणी अशी परिसुनी सुप्रसन्न भगवंत
म्हणे अर्जुना, 'ऐक लक्षणें होउनि सावध-चित्त ११०

सोडुनि नाना मनःकामना आत्म-तुष्ट जो राहे
आत्म-द्वारा, तया बोलती स्थित-प्रज्ञ तूं पाहें १११

५६ अंगावरतीं जरि कोसळती डोंगरही दुःखाचे
असे अढळ मन सदा जयाचें नांव न उद्वेगाचें ११२

आणि सुखाची हाव जयाच्या नाहीं अंतःकरणीं
संग-रहित निर्भय अक्रोधी स्थित-प्रज्ञ तो मौनी ११३

५७ पदार्थमात्रीं अनासक्त जो शुभाशुभीं सम-चित्त
हर्ष-विषादा न भजे सहजें स्थित-प्रज्ञ तो संत ११४

५८ जसा आवरी कासव अपुले अवयव ते अवधारीं
तशीं इंद्रियें विषयांतुनि घे स्थित-प्रज्ञ माघारीं ११५

५९ विषय तोडिले तरि न हटतटें तुटे तयांची गोडी
आत्म-दर्शनीं ती हि जळोनी तो स्व-सुखातें जोडी ११६

६० नर हि जाणता जरि यत्न करी मनोनिग्रहासाठीं
उच्छृंखल तीं इंद्रियें बळें लागती तयापाठीं १७
क्षणांत साचें मन चि तयाचें घेती आकर्षून
ऋद्धि-सिद्धिच्या मिषें विविध ते विषय तया दावून ११८
गुंतुनि विषयीं साधक होई तदा इंद्रियाधीन
अभ्यासीं मन राहे ना क्षण निग्रह-कर्म कठीण ! ११९

६१ आवरुनी तीं सर्व मागुतीं मन स्व-रूपीं घाली
जया इंद्रियें सु-वश तयाची प्रज्ञा सु-स्थिर झाली १२०
विषय विसरुनी रत चैतन्यीं संतत अंतःकरण
म्हणुनी पार्था, तोचि सर्वथा योग-युक्त तूं जाण. १२१

६२ अल्प हि चिंतन अंतःकरणीं होय जरी विषयांचें
घात विवेका तरी साधका अधःपतन तें साचें १२२
विषय चिंतितां उपजे चित्ता तद्विषयीं आसक्ति
आसक्तींतुनि सहजें प्रकटे अभिलाषाची मूर्ति १२३
अभिलाषीं त्या क्रोध राहिला कीं आधीं चि लपून
भोगीं येतां प्रत्यवाय मग तो प्रकटे संपूर्ण १२४

६३ आणि पांडवा, क्रोधीं जागे सदैव तो अविवेक
म्हणुनि अर्जुना, तदा सुचेना कार्याकार्य-विवेक १२५
त्या अविवेकीं जन्म घेतसे स्मृति-भ्रंश निभ्रांत
स्मृति भ्रंशतां बुद्धि-विनाशें सर्वस्वाचा घात ! १२६

६४ सुटुनी प्रीति-द्वेष इंद्रियें स्वाधीन जधीं होत
आत्म-निष्ठ तो प्रसाद साधी वावरुनी विषयांत १२७
विश्वीं जडलें सर्वत्र तया आत्मत्वाचें नातें
उरले कुठुनी विषय कवण ते बाधतील कवणातें ? १२८
बुडेल पाणी जळीं ? विस्तवें जळेल केवीं आगी ?
स्वयें चि होतो विश्वात्मक तो पार्था, विषय-विरागी. १२९
६५ 'प्रसाद' अथवा अखंड सहज प्रसन्नता चित्ताची
तया लाभतां नुरे चि पार्था, वार्ता भव-दुःखाची १३०
निर्वातींचा दीप सर्वथा नेणे जैसा कंप
तद्बुद्धीतें स्थिरता येते तैसी आपोआप ! १३१
६६ चित्त जयाचें अप्रसन्न जो योग-युक्त ना पार्था,
जाण सर्वथा असे तयाच्या बुद्धीतें अस्थिरता १३२
आणि भावना आत्म-निष्ठ ना मुळीं जयाची झाली
'सोऽहं' 'सोऽहं' अशीं अक्षरें कधीं न कानीं आलीं १३३
तया अभाविक नरा शांतिचा झरा चि न पडे दृष्टी
मुळीं न नजरानजर सुखाची म्हणुनि होतसे कष्टी १३४
६७ आणि सेवितां आपआपुले विषय इंद्रियें पाहीं
तयां इंद्रियापाठिं हांवरें धांवत जें मन जाई १३५
बुडवी वारा नाव सागरीं तद्वत् जणुं तें ऐक
तद्बुद्धीतें हरी, करी जी आत्मानात्म-विवेक १३६

६८ म्हणुनि इंद्रियें विषयांपासुनि जयें पूर्ण आवरिलीं
जाण अर्जुना, असे तयाची प्रज्ञा सुस्थिर झाली १३७

६९ प्राणि-मात्र निद्रिस्त ब्रह्मीं तिथें संयमी जागे
विषयीं जागृत अज्ञ जन तिथें ज्ञानी मुनि निद्रा घे १३८

७० समृद्ध सरिता-ओघ सागरीं सर्व हि मिळती जाण
तरी सर्वथा सागर न करी मर्यादातिक्रमण १३९

तेविं अर्जुना, सकल कामना घेती जेथ विराम
पूर्ण-काम तो शांति भोगितो नच जो पुरुष सकाम १४०

७१ निष्कामत्वें जगीं वावरे जो निःस्पृह निरुपाधि
निरहंकारी निर्मम नर तो परम शांति संपादी १४१

७२ ब्राह्मी-स्थिति ही लाभतां तया मोह न राहे चित्तीं
प्रयाणीं हि ती टिकुनी होते ब्रह्म-पदाची प्राप्ति.' १४२

येथें भावार्थ गीतेचा द्वितीयाध्याय संपला ।
असे ह्यांत प्रधानत्वें सांख्य-योग निवेदिला ॥ २ ॥